Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय : विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत होणा–या स्वयंम परीक्षा व महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत होणा–या परीक्षेच्या अनुषंगाने विद्यापीठ परीक्षेबाबत.**

शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील मार्च / एप्रिल, 2021 उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार दि. 10 ऑगस्ट, 2021 पासून ऑनलाईन पध्दतीने प्रारंभ झालेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत आयोजित करण्यात येत असलेली स्वयंम परीक्षा दि. 28 व 29 ऑगस्ट, 2021 रोजी व महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत आयोजित करण्यात येत असलेली सहाय्यक पदासाठीच्या परीक्षा दि. 20 ऑगस्ट, 2021 रोजी घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थी हितास्तव खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

1. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत दि. 28 व 29 ऑगस्ट, 2021 रोजी आयोजित केलेल्या स्वयंम परीक्षेस तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत दि. 20 ऑगस्ट, 2021 रोजी आयोजित केलेल्या सहाय्यक पदासाठीच्या परीक्षेस जे विद्यार्थी बसणार आहेत अशा विद्यार्थ्यांची विद्यापीठामार्फत पुर्नपरीक्षा आयोजित करण्यात येत आहे. तसेच सदर पुर्नपरीक्षेचे वेळापत्रक संबंधीत ऑन परीक्षा विभागाकडून यथावकाश जाहीर करण्यात येईल.
2. जे विद्यार्थी स्वयंम परीक्षेस तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत होणा–या परीक्षेस बसणार आहेत अशा विद्यार्थ्यांची माहिती योग्य त्या कागदपत्रासह (संबंधीत परीक्षा हॉलतिकीट, विद्यापीठ परीक्षा ॲडमिट कार्ड, ) महाविद्यालयाने संबंधीत ऑन परीक्षा विभागास दि. 31 ऑगस्ट, 2021 पर्यंत कळविण्यात यावी.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

गजानन पळसे
प्र. संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)

जा. क्र. शिवाजी वि. / परीक्षक नियुक्ती / आरव्हीसी / 633
दि. 18 AUG 2021

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,
   सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व उपकुलसचिव / सहा.कुलसचिव / समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य त्या सुविधा / कार्यवाहीसाठी
4. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
5. दूरशिक्षण केंद्र
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
7. जनसंपर्क अधिकारी – प्रसिध्दीकरीता

D/December2020/Letter